# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०५
# सभा क्र.०६, दिनांक ३०/०४/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दि. ३०/०४/२०२५ रोजी दुपारी ३.४५ (तीन वाजून पंचेचाळीस मिनिटे) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. ओमप्रकाश दिवटे | – | अति.महा.आयुक्त (वि.) |
| मा. सौ. योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा. उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. सौ. प्रतिभा पाटील | – | उपायुक्त, (सा.प्र. व भूसंपादन) |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मुख्य अभि.(पथ) |
| मा. नंदकिशोर जगताप | – | मुख्य अभि.(पापु.) |
| मा. युवराज देशमुख | – | मुख्य अभि.(पापु.) |
| मा. श्रीमती कल्पना बळीवंत | – | सहा. आरोग्य अधिकारी |
| मा. श्रीमती मनिषा शेकटकर | – | मुख्य अभि.(विद्युत) |

मा. प्रशासक – सभेला सुरूवात करावी.
नगरसचिव – सभेला सुरूवात करण्यात येत आहे, सुरवातीला दाखल विषय घेऊ.

## दाखल विषय

**विषय क्र.७३त्वर्य**

हडपसर मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या नाल्याची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. B P Khodade And Company यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७९,९९,९८८/- पेक्षा ४८.४८०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,२१,५९३=८२ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४१,२१,५९३=८२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/६५, दि.२८/०४/२०२५ चे.

मा. प्रशासक – दाखल मान्य करा, पण त्या ठिकाणी अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी व्हिजीट करावी.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७४त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.३५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.३५०.०० कोटी ७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/७९, दि.३०/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७५त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.१५०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.१५०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त

विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/८०, दि.३०/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

## कार्यपत्रिकेवरील विषय

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र.६५**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/०३/२०२५ ते ३१/०३/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.१/६३, दि.२५/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.६६**

दिनांक ३१/०३/२०२५ ते दिनांक ०६/०४/२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ७० आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/७१, दि.२९/०४/२०२५ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

### सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र.६७**

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या रस्त्यावरील मलवाहिन्यांची देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Malang construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७४,९९,९५२/- पेक्षा १.१७% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६२,६३,४२१=४२ अधिक जीएसटी र.रु.११,२७,४१६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२१,६१८/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७४,१२,४५५=४२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/६४, दि.२८/०४/२०२५ चे.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.६८**

कोंढवा येवलेवाडी कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या मुख्य मलवाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. HARISCHANDRA RANGNATH ANARSE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६२,९६,७२९/- पेक्षा ४.५१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६०,१२,७४६=५२ अधिक जीएसटी र.रु.१०,८२,२९४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६९,८४१/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७१,६४,८८१=५२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/६६, दि.२८/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.६९**

कोंढवा येवलेवाडी कार्यालया अंतर्गत येणाऱ्या उप नाल्या मधील मलवाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. HARISCHANDRA RANGNATH ANARSE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६२,२४,०११/- पेक्षा ४.५१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५९,४३,३०८=१ अधिक जीएसटी र.रु.१०,६९,७९५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१,५५,६५०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी

एकूण र.रु.७१,६८,७५३=१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/६७, दि.२८/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७०**

संगमवाडी स.नं. ५२ ५४ पार्ट येथे आद्यक्रांतीगुरू लहूजी वस्ताद साळवे यांचे स्मारक उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NIKHIL CONSTRCTION GROUP PRIVATE LIMTED यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५,८०,७३,३००/- पेक्षा ०.४०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,७८,४१,००६=८ अधिक जीएसटी र.रु.१,०४,११,३८१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४,९३,७५५/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.२,१२,०७५/- पर्यंत अशी एकूण र.रु.६,८९,५८,२१७=८ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/६८, दि.२८/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७१**

पुणे मनपा मुख्य इमारत येथे आपत्ती व्यवस्थापन विभाग उभारणे साठी स्थापत्य विषयक व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. EVEREST CONSTRUCTION COMPONY यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,६९,१०,३४९/- पेक्षा ७.९९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,५५,५७,६९०=१८ अधिक जीएसटी र.रु.२८,००,३८४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.४०,४५५/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,८३,९८,५२९=१८ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/७०,दि.२८/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**संकीर्ण**

**विषय क्र.७२**

उर्दू माध्यमिक विद्यालय बोपोडी पुणे ४११०२० येथे जून २०२५ पासून उर्दू  मध्यम विज्ञान शाखेचे उच्च माध्यमिक विद्यालय सुरु करणेसाठी मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक व तांत्रिक/६९, दि.२८/०४/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /–** xxx
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**दि. १६/०५/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /–** xxx
**(डॉ राजेन्द्र ब भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**